श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर यांना
गैरवर्तनाबाबत ग्रामपंचायत अधिकारी पदावरुन
तात्पुरते दूर करणेबावत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश ग्रामपंचायत विभाग/ग्रांप३/क्र.१२२५६३८
दिनांक - ०८ / ०५ /२०२५

१.गट विकास अधिकारी श्रीरामपूर यांचे कडील श्री. रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी यांचे गैरवर्तना बाबतचे प्राप्त दोषारोप दिनांक २१/१०/२०२४

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा नियम ३

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा नियम ३ नियम क्र.३ (१)(अ)

ज्या अर्थी श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर येथे कार्यरत असुन त्यांनी त्यांचे ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर केलेला असल्याचे निदर्शनास आलेले आहे. जिल्हा परिषद कर्मचा-याने सदैव निरपराद सचोटीने वागणे व कर्तव्यपरायण असणे आवश्यक व बधंनकारक आहे. तथापि श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर यांनी ग्रामसभेच्या आगोदर घेण्यात येणारी महिला सभा न घेणे ,कार्यालयीन आदेशाचा अवमान करणे अशा प्रकारचे ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा नियम ३ चा भंग केलेला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम क्र.३ (१) अ मध्ये दिलेल्या तरतूदीस अधीन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा शिस्तविषयक प्राधिकरण जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाव्दारे श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर यांचे विरुध्द प्राप्त दोषारोपांची शिस्तविषयक कार्यवाही अनिर्णित असल्याने श्री.डौले यांना सदरचा आदेश बजावलेच्या दिनांका पासून जिल्हा परिषद सेवेतुन ग्रामपंचायत अधिकारी या पदावरुन सेवा निलंबीत करीत आहे.

सदरचा सेवा निलंबन आदेश अंमलात राहील तेवढया कालावधीत श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी यांचे सेवानिलंबन कालावधीतील मुख्यालय पंचायत समिती पं.स. राहुरी येथे राहिल तसेच त्यांना देण्यात आलेल्या मुख्यालयाच्या तालुक्याचे गटविकास अधिकारी यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा(पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतूदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. सेवानिलंबनाच्या कालावधीत श्री.रावसाहेब एकनाथ डौले यांनी इतर खाजगी नोकरी स्विकारु नये,तसे आढळून आल्यास सदर गैरवर्तनाबाबत पुरवणी दोपारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल. तसेच ते सेवानिलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

सेवानिलंबनाचे कालावधीत श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी यांना सेवानिलंबन निर्वाह भत्ता ज्या महिन्यात अदा करण्यात येईल. त्या वेळी त्यांनी कोणतीही खाजगी नोकरी स्विकारली नाही. अथवा कोणताही खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही. अशा आशयाचे प्रमाणपत्र सेवा निलंबीन कालावधीत दिलेल्या मुख्यालयाचे गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना सादर करणे बंधनकारक राहिल.

श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी यांना सेवा निलंबन कालावधीतील निर्वाह भत्ता नियमाप्रमाणे अदा करण्याची कार्यवाही या आदेशान्वये सेवा निलबंनानंतर दिलेल्या मुख्यालयाचे गट विकास अधिकारी हे करतील.

या आदेशाची नोंद श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202505081800E2 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 08-05-2025 15:05:46

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर
व्दारा :- गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीरामपूर
प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीरामपूर
२/-सदर सेवा निलंबन आदेश श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी यांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत या कार्यालयास विना विलंब सादर करावी.
प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती पं.स. राहुरी ---- जि.अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर